# देशिकेंद्र विद्यालयात सायबर सुरक्षेचे धडे; २०० हून अधिक विद्यार्थी लाभार्थी



लातूर :- राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती अभियानांतर्गत श्री देशिकेंद्र विद्यालय, सुतमिल रोड, लातूर येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम पार पडला.

सकाळी १० ते १२ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात इयत्ता ८ वी ते १० वी मधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सायबर वॉरिअर नरेश पंडित व सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना फोटो मॉर्फिंगमुळे होणारे धोके, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरून तयार होणाऱ्या प्रतिमा, मजबूत पासवर्ड तयार करण्याची योग्य पद्धत, तसेच मोबाईलमध्ये प इन्स्टॉल करताना आवश्यक आणि अनावश्यक परवानग्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. याशिवाय ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनेक शंकांचे निरसन करून

▶▶ पान ४ वर